शासकीय कार्यालयांमधून केला जाणारा
टपाल बटवडा खाजगी कुरीयरमार्फत न
करता केंद्रीय टपाल खात्यामार्फत करणेबाबत.

201601081102545907

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-१०.०४/५७०/प्र.क्र.१४/१८ (र.व का.)
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ८ ऑक्टोबर,२००४.

परिपत्रक

भारतामध्ये टपाल बटवडा वितरण करण्यासाठी भारतीय टपालसेवा भारत सरकारने स्थापन केलेली आहे. त्यांच्या असे निदर्शनास आले आहे की, टपाल व स्पीडपोस्ट टपाल वितरणाचे काम खाजगी संस्था (couriers) करत आहे. टपाल वितरण करणे हा टपाल खात्याचा विशेष हक्क आहे. याबाबत भारतीय टपाल कार्यालय अधिनियम,१८९८ मधील टपाल वितरणाशी संबंधित कायदेशीर कलमांचा व त्याचा भंग केल्यास करण्यात येणा-या कारवाईच्या विषयी गोषवारा (परिशिष्ट अ) जोडण्यात आला आहे.

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, शासकीय कार्यालयाकडून टपाल खात्यामार्फत, टपाल / स्पीड पोस्ट टपाल न पाठविता ते खाजगी टपाल वितरण संस्थेमार्फत वितरणासाठी पाठविले जाते ही कृती भारतीय टपाल अधिनियमांतील तरतूदींचा भंग करणारी आहे. तेव्हा शासकीय कार्यालयांनी शासकीय कार्यालये / व्यक्ती / संस्था इत्यादिंना पाठवयाची पत्रे भारतीय टपाल सेवेमार्फत पाठवावीत. खाजगी टपाल वितरण संस्था (couriers) मार्फत टपाल वितरण करण्यात येऊ नये अशी सूचना करण्यात येत आहे. सदर सूचनेचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(संजय उबाळे)
सचिव (प्र.सु.व र.व का.व वि.प्र.)

प्रत,

१. सर्व मंत्रालयीन विभाग
मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, हे परिपत्रक त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील विभाग / कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणावे.
२. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने.
३. निवड नस्ती.

D:\file D Drive\backuup 05.08.2010\My Documents Endorsment 9